# श्री राम चंद्र मिशन®
# इंडिया न्युजलेटर

जानेवारी २००८ | खाजगी वितरणाकरिता | खंड १ अंक १


प्रिय बंधू आणि भगिनींनो,

प्रणाम. श्री राम चंद्र मिशनच्या या इंडिया न्युजलेटर च्या पहिल्या अंकामध्ये आपले स्वागत आहे. या अंकामध्ये गुरुदेवांच्या नुकत्याच झालेल्या प्रवासाचा तसेच काही सूचक गोष्टींचा व देशभरातल्या घटनांचा समावेश आहे.

हे न्युजलेटर दोन महिन्यातून एकदा प्रकाशित करण्याची योजना आहे व ते इंग्रजीबरोबरच हिंदी, तमिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम, बंगाली, गुजराती व मराठी या भाषांमध्ये असेल. आपल्या पसंतीप्रमाणे अभ्यासी यापैकी कोणत्याही भाषेतील अंकासाठी नोंदणी करू शकतात. अशी नोंदणी केलेल्या सर्व अभ्यासींना हे न्युजलेटर ई-मेलने पाठविले जाईल. मिशनच्या वेबसाईटवर

Http://www.srcm.org/centers/as/in/newsletter/index.jsp हे न्युजलेटर उपलब्ध असेल.

संपूर्ण भारतामधून या अंकासाठीच्या बातम्यांचे स्वागत आहे. तुमच्या झोनच्या इन्चार्जनी स्वीकृत केलेल्या अशा बातम्या in.newsletter@srcm.org वर पाठवाव्यात. २० फेब्रुवारी २००८ पर्यंत आलेल्या बातम्या मार्चच्या अंकात प्रकाशित केल्या जातील.

तुम्हा सर्वांना नुतन वर्ष सुखसमृध्दीचे जावो, गुरुदेवांच्या आशिर्वादासह,

संपादकीय मंडळ

## पू. गुरुदेवांचा युरोप दौरा – ५ ते २९ डिसेंबर २००७



दि. ५ डिसेंबर २००७ रोजी पू. गुरुदेव व त्यांच्यासोबतच्या तीस अभ्यासींनी बेल्जीयमच्या ब्रसल्स शहरासाठी चेन्नईहून प्रस्थान केले. तेथे पोहचल्यानंतर गुरुदेवांनी आम्हा सर्वांना संयम व सहनशिलतेचा परिपाठ घालून दिला, तेथील हॉटेलच्या स्वागत कक्षामध्ये सकाळी ९.३० पासून दुपारच्या १२ वा. पर्यंत ते प्रतिक्षेत राहिले.

सहा तारखेच्या सकाळी पू. गुरुदेव पॅरिसला पोहोचले. तेथे एक हजार अभ्यासींचा समुदाय त्यांचे स्वागत करण्यासाठी उपस्थित होता. बाबूजी महाराजांनी पॅरिसच्या भेटीदरम्यान ज्या ठिकाणी मुक्काम केला त्या अभ्यासीच्या आयफेल टॉवर नजीकच्या अपार्टमेंटमध्ये गुरुदेवांनी मुक्काम केला. त्यानंतर १५ डिसेंबरला पू. गुरुदेव कारने व्राद्सला रवाना झाले व वेगवेगळ्या सोळा देशांमधून आलेल्या नऊशे अभ्यासींसोबत ते तेथे अकरा दिवस राहिले. गुरुदेवांच्या व्राद्स येथील या संपूर्ण ख्रिस्मस भेटीदरम्यानचे वातावरण उत्सवाचे होते. सभोवतालची जमीन बर्फ़ामुळे शुभ्र दिसत होती. नजिकच्या एका सिनेमागृहामध्ये 'द गोल्डन कंपास' हा चित्रपट पाहण्यासाठी काही अभ्यासी गुरुदेवांसोबत गेले. बाबूजी महाराजांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी ते यु.एस.ए. येथील क्लीव्हलँडला जाणार असल्याची घोषणा गुरुदेवांनी केली.

व्राद्स येथील अभ्यासींचा प्रेमळ निरोप घेऊन गुरुदेव २६ तारखेस पश्चिम जर्मनीच्या ब्रेमेन या छोट्या शहराकडे रवाना झाले. संध्याकाळी ब्रेमेन व इतर स्थानिक केंद्रांच्या अभ्यासींसोबत अनेक विषयांवर अन-औपचारिक गप्पांसाठी गुरुदेवांनी वेळ दिला तेव्हां सर्व अभ्यासींच्या आनंदाला पारावार उरला नाही. 'हृदयापासून बोलणे' या विषयावर बोलताना गुरुदेव म्हणाले," जर्मन लोक सत्यावर प्रेम करणारे आहेत. तुम्ही जेथे जाता तेथे काही तरी मागे सोडून जावे अशी शिकवण माझ्या गुरुदेवांनी मला दिली आहे, आणि मी जेव्हां सत्य कथन करतो तेव्हां ते तुमच्याकडे राहते-- कधी तरी तुम्ही यावर विचार कराल. तर आपण सदासर्वदा परस्परांशी हृदयापासून बोलले पाहिजे. आपापसतच नाही तर आपण ज्यांना भेटतो त्या सर्वांशी.



२७ च्या सकाळी गुरुदेवांनी ब्रसल्सला व तेथून २९ च्या रात्री चेन्नईसाठी प्रयाण केले. गुरुदेवांच्या सोबत प्रवास केलेल्या सर्व अभ्यासींच्या हृदयाला हेलावून टाकणारा हा अनुभव होता. हा प्रवास म्हणजे स्वत:बद्दल बिलकूल तमा न बाळगता अभ्यासींवरच्या संपूर्ण प्रेमामधून होणारे त्यांच्या हृदयाचे समुचित प्रकटीकरणच होते. अंतिमत: ते आम्हा सर्वांना स्वत:चे हृदय वापरण्यासाठी, निर्भयपणे विचार करण्यासाठी व योग्य गोष्टींचा पाठपुरावा करण्यासाठी उद्युक्त करीत होते.

बंधू एम.एम.धानुमुर्ती, तिरुपुर

## मणपक्कम चेन्नई येथील नवीन वर्ष.



ब्रसल्सहून निघून गुरुदेव रविवार दि. ३० डिसेंबर २००७ च्या मध्यरात्री २ वा. १५ मिनिटांनी चेन्नई विमानतळावर उतरले तेव्हां चारशेपेक्षा जास्त अभ्यासी त्याची प्रतिक्षा करीत होते. गुरुदेव प्रसन्नचित दिसत होते. त्थेथे त्यांनी भेटण्यासाठी जमलेल्या समुदायाला प्रतिसाद देत गुरुदेवांनी बराच वेळ तेथे दिला. त्यानंतर ते थेट बाबुजी मेमोरियल आश्रमाकडे गेले जेथे नवीन वर्षारंभी त्यांच्या सहवासात राहण्यासाठी मोठ्यासंख्येने अभ्यासी जमले होते. पुन्हा एकदा तेथील प्रेमळ स्वागताचा स्वीकार करण्यासाठी गुरुदेवांनी वेळ दिला.

इतक्या दूरच्या रात्रभर केलेल्या प्रवासानंतरदेखील सकाळी लवकरच तयार होऊन गुरुदेवांनी रविवार सकाळचा सत्संग केला तेव्हां ध्यानकक्षामध्ये जमलेल्या तीन हजाराहून अधिक अभ्यासींना अत्यानंद झाला. दिवसभरच्या उरलेल्या वेळात व तसेच ३१ डिसेंबरच्या सकाळपर्यंत गुरुदेव नवीन प्रशिक्षकाना तयार करण्याच्या व इतर प्रशासकीय कामामध्ये व्यस्त होते. ३१ च्या संध्याकाळी त्यानी गोल्फ कार्ट मध्ये बसून आश्रमात फेर-फटका मारला.

एक जानेवारीच्या सकाळी गुरुदेवानी सत्संग केला तेव्हां पाच हजारापेक्षा जास्त अभ्यासी हजर होते. संध्याकाळचे काही क्षण कॉटेजच्या बाहेरील बाबूजी महाराजांच्या पुतळ्याजवळ त्यानी निस्तब्धतेत व्यतीत केले. एकूणच, २००८ च्या वार्षारंभी पू. गुरुदेवांच्या सान्निध्यात राहण्यासाठी आलेल्या अभ्यासींसाठी गुरुदेवांच्या प्रेमामध्ये व मणपक्कम आश्रमातील आध्यात्मिक वातावरणामध्ये ओलेचिंब होण्याचा हा एक विलक्षण योग होता.

-सहज संदेश मधून

**नवीन वर्षासाठी पू. गुरुदेवांचा संदेश**

**"तुम्हा सर्वांची आध्यात्मिक प्रगती भरभरून होवो."**

## ही, द हुक्का अँन्ड आय

या विशेष प्रकाशनासाठी आमच्याकडे सतत चौकशी होत असल्यामुळे पू. गुरुदेवांनी याचे वितरण सुरु ठेवण्यासाठी संमती दिली आहे. इच्छूक अभ्यासींना क्रेडीट कार्ड माध्यमा द्वारे खालील लिंक वापरून बुकींग करता येईल.

https://www.srcm.org/onlinebookstore/selectcountryForSubscriptions.jsp

हे विशेष प्रकाशन पुस्तकाच्या रूपात तमिळ व हिंदी भाषेत प्रकाशित करण्याचे ठरले आहे जेणे करून अभ्यासींना त्याचा फायदा होईल. 29 फेब्रुवारी 2008 पुर्वी मागणी करणाऱ्या अभ्यासींना रू 200/– व 1 मार्च 2008 पासून रू 300/– भरावे लागतील. या प्रकाशनाची योग्यपणे कार्यवाही होण्यासाठी अभ्यासींनी वेळेत मागणी करावी अशी विनंती.

तसेच या बाबत अभ्यासी पब्लिकेशन विभाग, केंद्रप्रमुख याच्याशी संपर्क साधू शकतात.

## सेवा

“सेवा करणे, प्रेम करण्यापेक्षा सोपे आहे, प्रेम करणे ही एक अतिशय अवघड गोष्ट आहे. सेवा करणे सोपे असते. तुमचे ह्रदय ओता आणि कुणाची सेवा करा, आपोआपच तुम्ही त्याचे प्रेम आणि त्याची ऋतज्ञता प्राप्त करता आणि त्याला जे काही तुम्हाला द्यावयाचे आहे ते सर्व त्याला द्यावेच लागते.”

(Heart to Heart Vol. 2 , Q/A pg 162 by Chariji)

## पू. बाबूजी महाराजांची १०९ वी जयंती, २००८

आम्हाला हे सुचित करतांना आनंद होत आहे की पू. गुरुदेवांनी, पू बाबूजी महाराजांच्या १०९ व्या जयंती निमित्त उत्तर अमेरिकेतील क्लिव्हलॅंड, ओहायो येथे एका आंतरराष्टीय सेमिनारचे आयोजन करण्याचे ठरविले आहे. या समारोहाचे कार्यक्रम स्थळ क्लिव्हलॅंड फेअर ग्राऊन्ड हे असेल. निसर्गसौंदर्य लाभलेल्या या १०० एकर जागेत दहा हजाराहून अधिक सहभागींची व्यवस्था होऊ शकते.

२८ एप्रिल ते १ मे २००८ दरम्यान साजरा होणाऱ्या या आंतरराष्टीय सेमिनार मध्ये सहभागी होण्यासाठी पू. गुरुदेवांनी जगभरातील सर्व अभ्यासींना निमंत्रीत केले आहे. जगभरातील सर्व केंद्राना या सेमिनारशी निगडीत सर्व माहिती ई–मेल द्वारे जानेवारीच्या २००८ पहिल्या आठवड्यात पाठविण्यात येईल.

## युथ प्रोग्राम : बाबूजी मेमोरियल आश्रम – ९वी बॅच

आम्हाला सूचित करण्यास आनंद होत आहे की युथ प्रोग्रामची ९वी बॅच दि. १ एप्रिल ते ३० जुन २००८ दरम्यान बाबूजी मेमोरियल आश्रम मणपक्कम चेन्नई येथे सुरू होत आहे. आश्रम व्यवस्थापनाचे प्रशिक्षण सहजमार्गातील युवकांना देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम सुरू केलेला आहे.

कार्यक्रमाची ठळक वैशिष्टे.

★ वास्तव्या दरम्यान आश्रमातील विविध विभागांची देखभाल करण्यासाठी लागणारे व्यापक प्रशिक्षण व सहजमार्ग साधना प्रशिक्षण.

★ कार्यक्रमादरम्यान आश्रमात राहण्याची विनामुल्य सोय. तसेच भोजन व निवास व्यवस्था देखील आश्रमातच केलेली आहे.

या प्रशिक्षणाच्या योग्यतेसाठी खालील अटी आहेत :

★ वय वर्षे २० ते ४० मधील भारतातील अभ्यासी .

★ अर्ज करण्यापूर्वी किमान दोन वर्ष साधना केलेली असावी.

★ एक किंवा दोन कार्यक्रमात (सहजमार्ग भंडारा) सहभागी झालेले असावे.

★ संबंधित झोनल इन्चार्ज किंवा केंद्रप्रमुख किंवा प्रशिक्षकांच्या सहीचे चांगल्या वर्तणूकीचे प्रमाण पत्र अनिवार्य आहे.

★ प्रशिक्षणार्थीना आश्रमात राहण्याची भोजनाची व्यवस्था मोफत उपलब्ध आहे. परंतु त्यांच्या वैयक्तिक खर्चाची तरतूद त्याना स्वत:ला करावयाची आहे व सोबत पुरेसे कपडे आणावयाचे आहेत.

★ संपूर्ण प्रशिक्षणामध्ये शिस्तबध्दरित्या व उत्साहाने सहभागी होण्याची तयारी हवी. प्रशिक्षण यशस्वी रित्या पूर्ण केलेले प्रशिक्षणार्थी मणपक्कम किंवा भारतातील इतर आश्रमात कर्मचारी म्हणून नेमणूकीस पात्र राहतील.

संपूर्ण प्रशिक्षण इंग्रजी मधून दिले जाणार आहे. या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या बंधु आणि भगिनींनी त्यांचे अर्ज संबंधीत झोनलईन्चार्ज/केंद्रप्रमुख/प्रशिक्षक यांच्या द्वारे पाठवावेत. योग्य पडताळणी नंतर निवड झालेल्या सहभागींशी ई–मेल/पोस्ट किंवा फोन द्वारे संपर्क साधण्यात येईल. पुढील लिंकवर अर्जाचा नमुना उपलब्ध आहे

http://www.srcm.org/members/ssandesh/2007/2007_12_Youth_Program_ApplicationForm.pdf

पूर्णपणे भरलेले अर्ज खालील पत्यावर पाठवावेत.

S. Prakash - Ashram Maintenance Manager,
Babuji Memorial Ashram, Shri Ram Chandra Mission Road,
Manapakkam, CHENNAI - 600 116.
Ph: + 91 44 4217 1111 / +91 98400 96454
Prakash@seechangeworld.com

## व्ही बी एस ई. प्रोग्राम






सैनिक स्कूल,अमरावती नगर, तामिळनाडू येथील प्राचार्यांच्या व एका जुन्या विद्यार्थ्याच्या विनंतीवरुन या शाळेत दि. १५ व १६ डिसेंबर २००७ रोजी मुल्याधारित आध्यात्मिक प्रशिक्षण (VBSE) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या शाळेत बालवाडी, प्राथमिक, व माध्यमिक विभागत कार्यरत असलेले ५० शिक्षक या कार्यक्रमात सहभागी झाले. प्राचार्य कर्नल जे.एच.सेम्युल यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले व ते म्हणाले की सध्या प्रत्येक शाळेसाठी ही काळची गरज आहे. प्रोत्साहन, नेतृत्व गुण, तणावमुक्तीचे व्यवस्थापन व तरुण वयात आलेल्या मुलांची जडण–घडण या विषयावर जास्त भर द्यावा असे त्यांनी आम्हाला सांगितले तसेच या व्यतिरिक्त प्राथमिक व माध्यमिकचा व्ही बी एस ई पाठ्यक्रम आणि यामधील धड्यांमधून शिकविल्या जाणाऱ्या नितीमुल्यांबाबत ही सांगण्यास सांगितले.

आम्ही शिक्षकांसाठी काही प्रात्यक्षिकांचे सत्र ठेवले होते. ही सत्रे त्यांना आवडली व सर्वांनी या मध्ये उत्साहाने सक्रिय सहभाग नोंदविला. मुख्याध्यापक लेफ्ट. कर्नल विरसिंग यांनी समारोप केला. रजिस्ट्रार स्क्वा. लीडर संजय पाटील हे दोन्ही दिवशी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमातील प्रशिक्षणार्थीशी 'मनाचे नियमन' व सहजमार्ग साधनापध्दतीबदल बोलण्याची संधी पण आम्हाला मिळाली. नवीन वर्षाच्याप्रारंभी एका 'ओपन हाऊस' चे आयोजन करण्यात तेथील प्राचार्यांनी रुची दाखविली.

भगिनी सीता कुंचितपादम – चेन्नई.

## मुझफ्फरपूर येथील प्रशिक्षण कार्यक्रम



मुझफ़्फ़रपूर केंद्रात दि. ८ डिसेंबर २००७ रोजी अभ्यासींसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतला गेला. या प्राथमिक प्रशिक्षण कार्यक्रमात बिहार व झारखंड झोनमधील जवळजवळ साठ अभ्यासींनी भाग घेतला. हा कार्यक्रम स्मृतीने (SMRTI) तयार केलेल्या प्रणालीवर आधारित होता. या कार्यक्रमाचे व्यवस्थापन बंधू डॉ. जी. एम. भटनागर व बंधू मनोज तिवारी यांनी केले.

साधनेच्या महत्वाच्या विविध पैलूंवर भाषणे दिली गेली व चर्चा केली गेली. सहभागी अभ्यासींनी साधनेच्या निरनिराळ्या पैलूंबद्दलचे त्याचे आकलन व्यक्त केले तसेच त्या गोष्टींच्या महत्वाबद्दल सुस्पष्टपणे माहिती करुन घेतली. प्रत्येक सत्रामध्ये सादरीकरण व सामान्य ज्ञान परिक्षा (Quiz) घेतल्यामुळे तो मनोरंजक झाला व त्यामधून बरीच माहिती मिळून सहजमार्गाचे जास्त चांगले आकलन होण्यासाठी त्यांचा उपयोग झाला.

संध्याकाळी एका खुल्या सभेचे (ओपन हाऊस) आयोजन केले होते ज्यामध्ये तीस निमंत्रितांनी सहभाग नोंदविला. सहजमार्गाच्या विविध पैलूंवर त्यांच्याशी चर्चा केली गेली व प्रश्नोतरांचा कार्यक्रमही घेतला गेला.९ डिसेंबर रोजी बंधू विजयकुमार यांच्या नियोजनाअतंर्गत युथ ट्रेनिंग प्रोग्राम घेण्यात आला. ह्या प्रोग्राम मागचा प्रमुख उद्देश होता – युवा अभ्यासींना तसेच हृदयाने (मनाने) युवा असणाऱ्या अभ्यासींना प्रोत्साहन देणे जेणेकरुन ते मिशनच्या कार्यपध्दतीमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवितील व झपाट्याने वाढत चाललेल्या या संस्थेमध्ये कार्य करणे त्यांना शक्य होऊन ते आदर्श अभ्यासींच्या रुपात पुढे येतील.

पहिले सत्र – "युवकांकडून गुरुदेवांच्या काय अपेक्षा आहेत?" "युवकांना साधनेमध्ये येणाऱ्या समस्या व त्यांचे निराकरण"

दुसरे सत्र – 'युवकांसाठी मार्गदर्शक सूचना व त्यांची अंमलबजावणी' या विषयावर बंधू अजयकुमार यांनी तर बंधू ब्रजेश बुर्नावाल यांनी 'युवकांसाठीचे वाङमय' या विषयावर सत्र घेतले.

त्यानंतरच्या वेळेत एक गटवार चर्चासत्र पार पडले ज्याचा विषय होता, 'या कार्यक्रमानंतर आम्ही आमची वैयक्तीक साधना कशी करू व आपल्या केंद्रामध्ये जाऊन काय करू?'. चर्चेनंतर प्रत्येक गटाने प्रातिनिधीक स्वरुपात त्या गटाच्या चर्चेचा सारांश सर्वांसमोर सादर केला.

अशा कार्यक्रमातून साधनेला उजाळा मिळत असल्यामुळे ते वरचेवर घ्यावेत असा अभ्यासींचा अभिप्राय होता.

## आंध्र प्रदेश – ओपन हाऊस



निरनिराळ्या केंद्रात मिशनच्या वाढीसाठी घरगुती बैठका व खुल्या सभा (ओपन हाऊस) आयोजित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. २३ ऑगस्ट २००७ रोजी भोगींर केंद्रात खुल्या सभेचे आयोजन करण्यात आल होते. या केंद्राची सुरवात २००७ वर्षाच्या सुरवातीला झालेली असून येथे तीनशे सक्रीय अभ्यासी आहेत. या खुल्या सत्रात हैद्राबाद येथील प्रशिक्षक तसेच बंधू श्री बिक्षम यांनी भाग घेतला. दोनशे लोकांनी या मध्ये सहभाग घेतला त्यापैकी वीस लोकांनी सुरवातीच्या सिटींग घेतल्या. या केंद्रात एका वर्षापूर्वी एकही अभ्यासी नव्हता यावर विश्वास ठेवणे देखील अशक्य आहे.

इतर अनेक ठिकाणी अशाच प्रकाच्या सभांचे आयोजन करण्यात आले – नागार्जूनसागर ॲग्रीकलचर युनिव्हर्सिटी बापटला येथील विद्यार्थी व कर्मचारी, मैदापूर येथील होम सायन्स आणि इंजिनिअरींग कॉलेज, कडप्पा येथील प्रॉव्हिडन्ट फंड ऑफिस, हैद्राबाद येथील एच.ए.एल.चे कर्मचारी व बी.एच.ई.एल कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या अंतर्भाव होता.

## कृपेसाठी सेवा (Serve to Deserve)





म्हैसूर केंद्रात दोन दिवसांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन दि. ३ व ४ नोव्हेंबर २००७ रोजी करण्यात आले. सेवा हाच जलद आध्यात्मिक प्रगतीचा एकमेव खात्रीशीर मार्ग असून सेवाद्वारेच आपण 'त्याच्या' कृपेसाठी पात्र होतो. हा संदेश देणे हाच या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता, त्यानुसार कार्यक्रमाचे उद्दिष्ट खालील प्रमाणे होते.

★ सेवेची आवश्यकता ओळखून सेवे संदर्भातील विविध पैलूंचे महत्व ओळखणे.

★ सेवेमध्ये 'सामुहिक कार्या'ची जाण करून घेणे.

★ मिशनमध्ये सध्या उपलब्ध असलेल्या सेवेच्या संधी समजून घेणे व त्यामध्ये सहभागी होण्याचे मार्ग जाणणे.

म्हैसूर, हन्सूर, के. आर. नगर, नंजनगुड, कोल्लेगळ, हन्नूर, चामराजनगर, टी. नरसीपूर इ. केंद्रामधून एकशे पंचवीस जणांनी भाग घेतला. या प्रशिक्षणासाठी बैंगलोर व म्हैसूर केंद्रातील अभ्यासींचे योगदान होते.

कार्यक्रमाची सुरवात सत्संगाने झाली. त्यानंतर सहभागींना या कार्यक्रमाचा हेतू सांगण्यात आला. त्यानंतर वेगवेगळ्या गटांमध्ये विभागलेल्या अभ्यासींना कामामध्ये सामुहिक प्रयत्नांच्या आवश्यकतेवर चर्चा करण्यासाठी सांगण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये काही खेळांचा अंतर्भाव करून त्याला सुखावह करण्याचे प्रयास झाले. ह्यामधुन अभ्यासींना कार्यपध्दती, सामुहिक प्रयत्नांचे महत्व, येणाऱ्या समस्या व त्यांचे निराकरण कसे करावे इ. गोष्टींचे आकलन होण्यास मदत झाली.

दुसऱ्या दिवशी सेवेच्या संदर्भातील चर्चा झाली – सेवेची आवश्यकता, स्वयंसेवकाची विचारसरणी, कामाचे नीतिशास्त्र, स्वयंसेवकाना प्रोत्साहन देण्यामागील व त्यांचे संगोपन करण्यामागील कार्यकर्त्यांची / प्रशिक्षकांची भूमिका इ. विषयांवर गटवार चर्चा झाली. प्रत्येक गटाच्या प्रतिनिधीने त्या गटाच्या चर्चेचा सार सांगितला.

त्यानंतर कार्यक्रमांमध्ये अभ्यासींसाठी गुरुदेव, मिशन व साधनेवर आधारित चाचणीपरिक्षा (क्वीझ) घेण्यात आली. चाचणीपरिक्षेनंतर मिशनच्या विविध उपक्रमाची माहिती उदा. ट्रेनिंग प्रोग्राम, ओपन हाऊस, व्हीबीएसई कार्यक्रम, पूर्ण दिवस कार्यक्रम इ. देण्यात आली. कार्यक्रमाची सांगता संध्याकाळच्या सत्संगाने झाली.

## चिल्ड्रेन सेंटर – बैंगलोर.



"मुले ही कुटुंबातील सलोखा, शांती व सुख–समाधान राखणारी विलक्षण साधने आहेत. जीवन आनंदी होण्यासाठी आवश्यक असणारे दोन घटक – प्रकाश व हास्य – मुले आपल्या जीवनात आणतात. ज्या कुटुंबात ही मुले जन्मतात केवळ त्या कुटुंबाच्याच भविष्याचे ते नेतृत्व करीत नसून संपूर्ण मानवजातीच्या भविष्याचे हे प्रतिनिधी असतात. त्यांच्या प्रगती व उन्नतीमध्ये सहभाग नोंदवून आम्ही एका विशिष्ट प्रकारे मानवजातीच्या भविष्याला आकार देण्याचेच काम करीत असतो." श्री पी. राजगोपालाचारी

बैंगलोर येथील चिल्ड्रेन सेंटरचे उद्दिष्ट, मुलांसाठी सलोख्याचे वातावरण निर्माण करणे आणि त्या मुलांच्या पालकांना ते रविवार सत्संगात सामिल असतांना त्यांची मुले सुरक्षित असल्याची खात्री देणे हे आहे.

या अनुषंगाने स्वयंसेवकांनी आळीपाळीने एका संयोजकाच्या मार्गदर्शनाखाली दर रविवारी कार्य करण्याच्या एका प्रणालीवर विचार करून तिची अंमलबजावणी केली. हा कार्यक्रम तीन महिने आधी ठरविला जातो व संयोजकांना त्यांच्या अनुभवाच्या आधारे कार्यक्रम ठरविण्याचे पूर्ण अधिकार दिलेले असतात. स्वयंसेवक हे मुलांसाठी अनुकरणीय असले पाहिजेत यावर भर दिला जातो.

या कार्यक्रमाचा चांगला उपयोग झालेला आहे व याची जमेची बाजू म्हणजे मुलांना दर आठवड्याला विविध उपक्रम करावयास मिळत आहेत जसे गोष्टीसांगणे, बाहुल्या तयार करणे, बाहुल्यांचा खेळ, कलाकुसर, चाचणी परिक्षा, अभिनय, गायन, वाचन, चित्रे काढणे इ, संयोजकाना ८ ते १० आठवड्यातून एकदाच संधी मिळत असल्यामुळे त्यांच्यामध्ये नवनवीन कल्पना राबविण्याचा उदंड उत्साह असतो. त्यांच्याकडे आगाऊ योजना तयार असतात व त्यामुळे कार्यक्रमामध्ये पुढे मागे करणेही सोपे जाते व स्वयंसेवकाना देखील रविवार सत्संग नियमीतपणे करण्यास मिळत आहे. स्वयंसेवकांनी कामामध्येच आसक्त राहण्याचा धोका यामुळे कमी झाला आहे. ज्यांना सुरवातीच्या समस्यांना तोंड देऊन त्या सोडवाव्या लागल्या होत्या ते आता जास्त आत्मविश्वासाने पुढच्या स्तरावरील योजना राबविण्यासाठी सज्ज झाले आहेत.

स्वयंसेवकांच्या प्रयत्नांमधून निर्माण झालेल्या सलोख्याच्या वातावरणाचा परिणाम म्हणून बरेच पालक आता पुढाकार घेऊन मदत करीत आहेत. काही पालक स्वयंसेवक म्हणून पुढे आले आहेत. सुरवातीच्या अडचणी असंख्य होत्या परंतु स्वयंसेवकांच्या व आश्रम कार्यालयाच्या संयमी वृत्तीमुळे त्या अडचणी तत्परतेने सोडविल्या गेल्या व अशा अडचणी पुन्हा येऊ नयेत म्हणून बदल करण्यात आले.

बंधु प्रभाकर रावूरी – बैंगलोर

## अभ्यासी ट्रेनिंग प्रोग्राम – इंदोर केंद्र





इंदोर येथील आश्रमात दि.२८ ते ३० डिसेंबर २००७ दरम्यान निवासी पध्दतीचा अभ्यासी ट्रेनिंग प्रोग्राम आयोजित करण्यात आला. मध्य प्रदेशातील विविध केंद्रामधून आलेल्या ९० अभ्यासींनी यामध्ये भाग घेतला. त्यांची राहण्याची व्यवस्था आश्रमात करण्यात आली. या कार्यक्रमात दैनंदिन साधना, सहजमार्ग साधनेच्या विविध पैलूंवर प्रवचने, गटवार चर्चा, प्रश्नोत्तरे, मिशनच्या पुस्तकांचे वाचन इत्यादी सत्रे पार पडली.

ह्या ट्रेनिंग दरम्यान, गुरुदेवांनी सांगितल्याप्रमाणे आपली साधना कशाप्रकारे केली पाहिजे यावर जास्त भर देण्यात आला. अभ्यासींमध्ये साधना नियमितपणे व निष्ठेने करण्याचा उत्साह व नवा जोम निर्माण झाल्याचे जाणवले. या प्रशिक्षणादरम्यान आलेले अनुभव शेवटच्या दिवशी काही प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमात पू. गुरुदेवांची उपस्थिती व कृपा प्रत्येकाला जाणवली.

बंधू अविनाश करमरकर व बंधू राजेश रावेरकर, इंदोर.

## गुजरात ट्रेनिंग प्रोग्राम



दर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्याच्या शेवटी, दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासुन साधना करणाऱ्या अभ्यासींसाठी एक ट्रेनिंग प्रोग्राम आयोजित केला जातो. हा कार्यक्रम हिंदी व गुजराती भाषेत एका–आड–एक घेतला जातो. संपूर्ण गुजरात झोनसाठी हा कार्यक्रम अहमदाबाद–अदलाज आश्रमात आयोजित केला जातो.

पू.गुरुदेवांच्या सांगण्यानुसार, या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश मिशनमधील प्रतिभेचा शोध घेणे आहे. या प्रतिभेच्या जोपासनेतून मिशनचे खरे आधारस्तंभ निर्माण होतील.

नुकताच गुजराती भाषेत पार पडलेला कार्यक्रम शनिवारी सकाळी ८ वा.सुरू होऊन रविवारी दु. ४ वा. समाप्त झाला. या कार्यक्रमात एकूण ४० अभ्यासी सहभागी झाले होते. कार्यक्रमातील विविध उपक्रमांमधून विचारांचे आदानप्रदान झाल्यामुळे प्रत्येकाला मोकळेपणाने स्वत:चे विचार सर्वांसमोर मांडता आले.

'केंद्रांच्या वाढीमध्ये मी स्वत:चा सहभाग कशा प्रकारे नोंदवू शकेन' या विषयावर अत्यंत हिरीरिने व उत्साहाने चर्चा झाली. आध्यात्मिक तथ्यांवर आधारित नाटिका विविध गटांनी सादर केल्या. आणखी एका सत्रामध्ये अभ्यासींना 'गुरुदेवांना पहिल्यांदा भेटल्यानंतर/पाहिल्यानंतर त्यांच्यांत कसा बदल झाला' या विषयावर बोलावयाचे होते. या भाषणांदरम्यान पू.गुरुदेवांची उपस्थिती प्रकर्षाने जाणवत होती. 'नवीन इच्छूकांना सहजमार्गाची ओळख कशाप्रकारे करून द्यावी' आणि 'साधनेतील सातत्याचे महत्त्व' या विषयांवर वक्त्यांनी भाषणे दिली ज्यामधून गुरुदेव, मिशन व साधनेबद्दलचे आणखी चांगल्या प्रकारे अभ्यासींना आकलन झाले, तसेच जीवनातील सत्य घटनांचा उल्लेख केल्यामुळे अभ्यासींना त्याची पडताळणी करता आली.

सहभागी झालेल्या वक्त्यांमधे बंधू सुरेश राजगोपालन, तारा चौहान, जिग्नेश शेलत, डॉ.विनोद अग्रवाल, डॉ. सुरेंद्र अग्रवाल, हिरेन शहा, भवीन पटेल, हर्षा चौहान, राजेंद्र राठोड, विभा राठोड, विलास भोंडे, समीत पटेल यांचा समावेश होता.

एका सत्राअंतर्गत प्रत्येक गटासाठी एक विषय दिला होता ज्यामागे दडलेला आध्यात्मिक अर्थ त्यांना सांगावयाचा होता, आध्यात्मिक दृष्ट्या प्रकाश टाकणारे असे हे सत्र होते. शनिवारच्या कँप फायरदरम्यान सहभागींच्या गायन व एक पात्री अभिनयामुळे अभ्यासी गटांमधील बंधुभाव व मैत्री वृध्दिंगत झाली.

चारही सामुहिक सत्संग विशेष होते. सत्संगामधून निर्माण झालेल्या अशा वातावरणामुळे अभ्यासींची आंतरिक तळमळ वाढण्यास निश्चीतच मदत होते. या कार्यक्रमांच्या फलिताबद्दल आम्ही पूर्ण आशावादी आहोत. आम्हाला असा विश्वास आहे की, अशा कार्यक्रमांतूनच २४ जुलै २००९ च्या बडोदा येथील कार्यक्रमांसाठी निष्ठापूर्वक कार्य करणारी अभ्यासींची फळी निर्माण होईल.

© २००८ श्री राम चंद्र मिशन ("SRCM"). सर्व हक्क सुरक्षित.
"श्री राम चंद्र मिशन","सहज मार्ग","SRCM","Constant Remembrance", आणि संस्थेचे चिन्ह या मिशनच्या नोंदणीकृत सेवामुद्रा आहेत. हे पत्रक केवळ एस.आर.सी.एम.च्या सदस्यांकरिताच असून या मधील मजकूर वापरला जाऊ शकतो. या मधील विचार एस.आर.सी.एम.चे असतीलच असे नाही.
Privacy Statement : http://www.srcm.org/members/privacypolicy.jsp